सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/११३ दिनांक : २०/०७/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : सांस्कृतिक कार्यशाळेच्या सहभागाबाबत.**
**संदर्भ क्र.** : या विभागाचे विविमं/२०२६–२७/०८९ दिनांक ०८/०७/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळातंर्गत विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रमाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येते. महामहिम राज्यपाल तथा मा. कुलपती यांचे आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील कृषि व अकृषि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांकरिता इंद्रधनुष्य युवक महोत्सव, भारतीय विश्वविद्यालय महासंघ, नवी दिल्ली यांचेद्वारा दक्षिण पश्चिम विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव व यासारख्या विविध युवक महोत्सवात या विभागामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संघ सहभागी होत असतो.

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून विद्यार्थी विकास मंडळामार्फत आपल्या महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी शनिवार, दिनांक १८ जुलै, २०२६ पर्यंत भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थी व सांस्कृतिक समन्वयक यांना सांस्कृतिक मार्गदर्शन प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने माहे जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडा किंवा माहे ऑगस्टच्या प्रथम आठवड्यामध्ये सांस्कृतिक कार्यशाळेचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच या विभागामार्फत दरवर्षी जल्लोष युवक महोत्सवाचे विभाग/जिल्हानिहाय आयोजन करण्यात येत असते. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य आणि ललित कला असे कलाप्रकार व त्यातील उपप्रकार असतात. आपला संघ तयार होण्याच्या दृष्टीने सदर कार्यशाळेमध्ये प्रत्येक महाविद्यालयातील दोन विद्यार्थी (एक मुलगा व एक मुलगी) आणि सांस्कृतिक समन्वयक सहभागी होणे अनिवार्य आहे.

१. महाविद्यालयाने आपल्या सांस्कृतिक समन्वयक व विद्यार्थी सहभागाची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने (www.unipune.ac.in – BOD Online – Login – Students' Development – Menu – सांस्कृतिक कार्यशाळा नाव नोंदणी) शनिवार, दिनांक २५ जुलै, २०२६ पर्यंत भरणे आवश्यक आहे.
२. ऑनलाईन नाव नोंदणी अर्ज भरण्यापूर्वी प्रस्तुत पत्राचे संपूर्णतः काळजीपूर्वक अवलोकन करणेबाबत संबंधितास आपल्या स्तरावर सूचित करावे. ऑनलाइन नोंदणी केलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांस या सांस्कृतिक कार्यशाळेमध्ये प्रवेश दिला जाईल. आपण केलेल्या नाव नोंदणीच्या आधारे पुढील व्यवस्था करणे सुकर होणार आहे, याची दक्षता घ्यावी.
३. सदर सांस्कृतिक कार्यशाळेच्या प्रत्यक्ष आयोजनाबाबतची सविस्तर माहिती या विभागामार्फत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

आपल्या महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयक आणि वरील कलाप्रकारातील कलाकार एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी यांना सदर सांस्कृतिक कार्यशाळेमध्ये सहभागी होणेबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

संपर्क क्र. : ०२०२५६२२६८०

सोबत : कलाप्रकाराची यादी

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

| अ. क्र. | कलाप्रकार |
|---|---|
| | **संगीत विभाग** |
| १ | वैयक्तिक सुगम गीत |
| २ | भारतीय शास्त्रीय गायन (Indian Classical Vocal) |
| ३ | नाट्य संगीत |
| ४ | भारतीय स्वारवाद्य वादन (Indian Classical Instrumental Solo (Non Percusion)) |
| ५ | भारतीय ताल वाद्य वादन (Indian Classical Instrumental Solo (Percusion)) |
| ६ | भारतीय समूह गायन (Group Song-Indian) |
| ७ | लोक वाद्यवृंद (Folk Orchestra) |
| ८ | पाश्चिमात्य वैयक्तिक गीत (Western Vocal Solo) |
| ९ | पाश्चिमात्य समूह गीत (Group Song -Western) |
| १० | पाश्चिमात्य वाद्य वादन (Western Instrumental Solo) |
| | **नृत्य विभाग** |
| ११ | लोक नृत्य (Folk Dance) |
| १२ | शास्त्रीय नृत्य (Classical Dance Indian) |
| | **नाट्य विभाग** |
| १३ | एकांकिका (One Act Play) |
| १४ | प्रहसन (Skit) पथनाट्य |
| १५ | मूकनाटक/मूकनाट्य (Mime) |
| १६ | नकला (Mimicry) |
| | **साहित्य विभाग** |
| १७ | प्रश्नमंजुषा (Quiz) |
| १८ | वक्तृत्व स्पर्धा (Elocution) |
| १९ | वादविवाद स्पर्धा (Debate) |
| | **ललित कला विभाग** |
| २० | स्थळ चित्र (On the Spot Painting) |
| २१ | मांडणी कला (Installation) |
| २२ | चिकटकला/कात्रण कला (Collage) |
| २३ | पोस्टर मेकिंग (Poster Making) |
| २४ | व्यंगचित्र (Cartooning) |
| २५ | रांगोळी (Rangoli) |
| २६ | मेहंदी (Mehendi) |
| २७ | मृद मूर्ती/माती कला (Clay Modeling) |
| २८ | स्थळ छायाचित्रण (Spot Photography) |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/०८९ **मुदत वाढ** दिनांक : ०८/०७/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांच्या माहितीबाबत..**
**संदर्भ क्र.** : या विभागाचे विविमं/२०२६–२७/०७३ दिनांक ०८/०७/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून विद्यार्थी विकास मंडळामार्फत आपल्या महाविद्यालयातील **कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी बुधवार, दिनांक १४ जुलै, २०२६ पर्यंत भरण्याबाबत** कळविण्यात आले होते.

वरील संदर्भीय पत्राच्या अधिन राहून कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी करण्याची **मुदत वाढ शनिवार, दिनांक १८ जुलै, २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

संघातील विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता या विभागामार्फत दरवर्षी पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थ्यांकरिता जल्लोष युवक महोत्सवाचे विभाग/जिल्हानिहाय आयोजन करण्यात येत असते. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य आणि ललित कला असे कलाप्रकार व त्यातील उपप्रकार असतात. आपला संघ तयार होण्याच्या दृष्टीने कलाप्रकारांमधील कलाकार विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग नजिकच्या काळात येणाऱ्या विविध स्पर्धेसाठी होईल म्हणूनच आपणास आवाहन करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी खालील लिंक द्वारे मुदत वाढीतच शनिवार, दिनांक १८ जुलै, २०२६ पर्यंत भरावी.

| माहिती भरण्याची लिंक |
|---|
| https://forms.gle/Y5uL4A7VnHsCZGdG7 |

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

संपर्क क्र. : ०२०२५६२२६८०

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/०७३ दिनांक : ०८/०७/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांच्या माहितीबाबत..**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळातंर्गत विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रमाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येते. महामहिम राज्यपाल तथा मा. कुलपती यांचे आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील कृषि व अकृषि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांकरिता इंद्रधनुष्य युवक महोत्सव, भारतीय विश्वविद्यालय महासंघ, नवी दिल्ली यांचेद्वारा दक्षिण पश्चिम विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव व यासारख्या विविध युवक महोत्सवात या विभागामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संघ सहभागी होत असतो.

संघातील विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता या विभागामार्फत दरवर्षी पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थ्यांकरिता जल्लोष युवक महोत्सवाचे विभाग/जिल्हानिहाय आयोजन करण्यात येत असते. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य आणि ललित कला असे कलाप्रकार व त्यातील उपप्रकार असतात. आपला संघ तयार होण्याच्या दृष्टीने कलाप्रकारांमधील कलाकार विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग नजिकच्या काळात येणाऱ्या विविध स्पर्धेसाठी होईल म्हणूनच आपणास आवाहन करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील **कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी खालील लिंक द्वारे बुधवार, दिनांक १४ जुलै, २०२६ पर्यंत भरावी.**

| माहिती भरण्याची लिंक |
|---|
| https://forms.gle/Y5uL4A7VnHsCZGdG7 |

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

संपर्क क्र. : ०२०२५६२२६८०

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ